# वार्षिक अहवाल

# २०१४ - २०१५

॥ नास्ति सेवा समो धर्म ॥

## डॉ. हेडगेवार सेवा समिती, नंदुरबार

# वार्षिक अहवाल 2014-15

## नमस्कार आणि वंदे मातरम्

डॉ.हेडगेवार सेवा समिती, नंदुरबार च्या छत्रछायेखाली आपण सारे काम करीत आहेत. अर्थात काम करतांना देखील ते पाटया टाकणं होत नाही ना याकडे देखील आपण डोळयात तेल घालून लक्ष देत आहोत.

आपल्या संस्थेसाठी काही वेळा संसाराकडेही नाही म्हटले तरी थोडेसे दुर्लक्ष होते आणि ते स्वाभाविक आहे. हे लक्षात आल्यामुळे संस्थेने वर्षातला एक दिवस संस्थेचा वार्षिकोत्सव करायचे ठरवले. संस्थेतल्या मा.अध्यक्षांपासुन शेवटचा घटक असणा-या चतूर्थ श्रेणी कर्मचा-यांपर्यन्त (या सा-यांना आपण विकास सहयोगी असे म्हणतो) सा-यांनी आपल्या रोजच्या कामातून एक दिवस सहकुटूंब एकत्र यावे आणि आनंद महोत्सव साजरा करावा, आपण करीत असलेल्या कामात उर्जा देणा-या काही यशोगाथांची मांडणी करावी. महिला, छोटेदोस्त, आपण सारे विकास सहयोगी यांत मोकळेपणे सम्मीलित व्हावेत आणि पून्हा नेहमीच्या उभरीने पूढच्या वार्षिकोत्सवापर्यन्त *`सेवा है यज्ञ कुंड समिधा सम हम जले`* हया पद्य पंक्तीला साध्य करण्यासाठी झोकुन देऊन काम करीत राहावे. हे सारे करीत असतांना आम्ही वर्षभरात केलेल्या कामाचा लेखाजोखा मांडता यावा म्हणून कार्य अहवाल तयार केला आहे. संस्थेचापरीचय यथायोग्य व्हावा हाच त्या मागचा उद्देश. कार्य अहवाल बघा, वाचा चांगल्या गोष्टींचे कौतूक करा काही चूका असल्या तर अवश्य सांगा. आपल्या सा-यांचा कामाचा, आणखी पुढे जाण्याचा आश्वासक थांबा आहे वार्षिकोत्सव. आपण आनंद लुटू या आणि म्हणू या `आनंद मंगल करु आरती`

संपादक मंडळ



## डॉ.हेडगेवार सेवा समिती, नंदुरबार

BPT REG.- F / 2268 / DHULE

SRA. REG.- MAHARASHTRA / 2439 / DHULE

80-G Certificate No. (NSK/CIT-1/80-G(5) valid from dated-01-04-2009)

# विश्वस्त मंडळ (2014-2019)

| | |
|---|---|
| श्री. कृष्णदास काशिनाथ पाटील | अध्यक्ष |
| श्री. रविंद्र गजानन बेलपाठक | उपाध्यक्ष |
| श्री. ललितकुमार बाळकृष्ण पाठक | सचिव |
| श्री. वासुदेव बळवंत राव | खजिनदार |
| श्री. रंगनाथ रुंझाजी नवले | सदस्य |
| श्री. नानाभाऊ ओंकार माळी | सदस्य |
| श्री. केदारनाथ रत्नाकर कवडीवाले | सदस्य |
| श्री. जत्र्या लिंबा पावरा | सदस्य |
| श्री. अजय ओमप्रकाश शर्मा | सदस्य |
| डॉ. नितीन विष्णू पंचभाई | सदस्य |
| श्रीमती. मिनल संजय म्हसावदकर | सदस्या |

अ) संस्थात्मक माहिती -

A) संस्थेचे नाव - डॉ. हेडगेवार सेवा समिती, नंदुरबार

i) रजिस्ट्रेशन क्रमांक - महा./ 2439 / धुळे दि. 18/09/1991.
- एफ / 2268 / धुळे दि. 22/05/1992.

ii) पत्रव्यवहारासाठी पत्ता - 20, इंदिरा सदन, लोकमान्य कॉलनी, नंदुरबार फोन क्र.-02564-223910
Website - www.hssnandurbar.org
E-mail- hssnandurbar@gmail.com

B) अहवाल वर्षात कार्यकारणी मंडळाच्या एकुण झालेल्या सभा - 6.

C) लेखापरिक्षकांचे नाव व पत्ता -

श्री. प्रकाश जी. पाठक
प्रकाश जी पाठक ऍन्ड असोसीएट्स
चार्टड अकॉंटटस
16, अर्थव, विनायक नगर
वाडीभोकर रोड, देवपूर, धुळे.

D) Bankers -


a. State Bank of India
b. Bank of India
c. Bank of Maharashtra
d. Union Bank of India
e. Jalgaon Janata Sah. Bank
f. Dhule & Nanurbar District Bank
g. Bank of India

E) कर्मचारी माहिती-

| | |
|---|---|
| • डॉ. हेडगेवार सेवा समिती, नंदुरबार | - 04 |
| • कृषि विज्ञान केंद्र, कोळदा | - 15 |
| • National Initiative Climate Resilient Agriculture | - 02 |
| • प्राथमिक आश्रम शाळा जळखे | - 17 |
| • माध्यमिक आश्रम शाळा जळखे | - 11 |
| • ट्रायबल डेव्हलपमेंट प्रोजेक्ट | - 04 |
| • शिक्षण संसाधन केंद्र | - 01 |



F)) प्रकल्प वृक्ष -




G) अन्य हितसंबंधी संस्था-

- BAIF
- AGRICULTURALAUNIVERCITIES
- NABARD
- VARIOUS NGO`s

ब) कार्याची माहिती

(i) प्रकल्प, उद्देश व त्यांची कार्ये

१. प्रकल्प - प्राथमिक व माध्यमिक आश्रमशाळा, जळखे

उद्देश - शिक्षणाच्या सोयी उपलब्ध करुन देणे. शिक्षणासह सुसंस्कारीत व ध्येयप्रवण पिढी उभी करणे.

कार्य - नंदुरबार जिल्हयातील 6 तालुक्यातुन 84 गावातुन 489 विद्यार्थी व विद्यार्थीनींचे इ. 1 ली ते इ. 10 वी पर्यंतचे निवासी शिक्षण उपलब्ध.

२. प्रकल्प - ग्रामीण उत्थान प्रकल्प (VDP)

उद्देश - ग्रामीण विकासासाठी कार्य करणे व विकासाचे सुसंगत मॉडेल उभे करणे.

कार्य - या प्रकल्पाअंतर्गत विविध यंत्रणांनी आपापले प्रयोग, प्रात्यक्षीके, प्रशिक्षणे राबवुन एकत्रित व समन्वयीत पध्दतीने ग्राम विकास करणे. हा प्रकल्प धडगाव तालुक्यात राबविला जातो.

३. **प्रकल्प - जनजाती विकास प्रकल्प (TDP)**

**उद्देश** - ग्रामीण विकासासाठी कार्य करणे व विकासाचे काल सुसंगत मॉडेल उभे करणे.

**कार्य** - प्रकल्पाअंतर्गत 500 कुटूंबांसाठी शेतीतुन दरवर्षी उत्पन्नाची सोय करुन देणे जेणे करुन शेतकऱ्यांचे व पर्यायाने त्यांच्या पिढीचे स्थलांतर थांबविणे.

४. **प्रकल्प - कृषि विज्ञान केंद्र (KVK)**

**उद्देश** - कृषी संबंधीचे आधुनिक तंत्रज्ञान लोकांपर्यंत पोहचविणे.

**कार्य** - संपुर्ण जिल्हयात वर्षभर विविध कार्यक्रमांच्या माध्यमातुन व प्रत्यक्ष शेतकऱ्यांच्या भेटी घेवुन शेतकऱ्यांपर्यंत तंत्रज्ञान पोहोचविण्याचे कार्य हया केंद्रामार्फत चालते. दरवर्षी 7 दिवसीय कृषी तंत्रज्ञान महोत्सवाचे आयोजन केले जाते.

५. **प्रकल्प- शिक्षण संसाधन केंद्र (ERC)**

**उद्देश** - औपचारिक शिक्षणासोबत अनोपचारिक शिक्षणाची माहिती देणे.

**कार्य** - नंदुरबार जिल्हयातील काही पुर्व प्राथमिक शाळांमधील विद्यार्थ्यांचा गुणवत्ता विकास करणे.

(ii) **संस्थेच्या कार्याची भौगोलिक व्याप्ती -**

**नंदुरबार व धुळे जिल्हा (सध्या नंदुरबार जिल्हयात कार्य सुरु आहे)**

(iii) भविष्यातील उपक्रम -

- **आरोग्य सेवा**
- **इंग्लिश मिडीयम स्कुल**

**श्रध्दांजली**

अहवाल वर्षात संस्था परिवारातील, वेगवेगळया क्षेत्रातील मान्यवर किंवा ज्ञात अज्ञात देवाज्ञा झालेल्या व्यक्तींना भावपुर्ण श्रध्दांजली



1) **आषाढी एकादशी चप्पल सेवा -**

आषाढी एकादशी निमित्ताने शहरातील विठ्ठल मंदिरावर संस्थेतर्फे मोफत चप्पल सेवा देण्यांत आली. दर्शनासाठी येणा-या हजारो भाविकांनी या सेवेचा लाभ घेतला. सदर सेवेसाठी संस्थेचे सचिव श्री.ललित पाठक व सभासद श्री.बळवंत निकूंभ पुर्ण दिवस उपस्थित होते. जळखे आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांनी सुध्दा या सेवेसाठी उत्स्फुर्त प्रतिसाद नोंदविला. संस्थेचे सभासद श्री.राजाराम माळी यांनी सुध्दा सहभाग नोंदविला.

2) **व्यक्तिमत्व विकास कार्यक्रम -**

संस्थेमार्फत डी.आर.हायस्कुल, नंदुरबार येथील ज्युनिअर कॉलेजच्या 60 विद्यार्थ्यांना सकारात्मक दृष्टिकोनाचे महत्व याविषयावर मार्गदर्शन करण्यांत आले. सदर कार्यक्रमांस संस्थेतर्फे प्रशासकिय अधिकारी श्री.गिरीश बडगुजर यांनी मार्गदर्शन केले. सदर कार्यक्रमांसाठी शिक्षक वर्ग सुध्दा उपस्थित होता.

3) **भारतीय अर्थसंकल्प व्याख्यान -**

भारतीय अर्थसंकल्प 2014 या विषयांवर जेष्ठ विचारवंत श्री.प्रकाश पाठक यांचे व्याख्यान आयोजित करण्यांत आले. सदर कार्यक्रमांत शहरातील 90 व्यक्तींनी सहभाग नोंदविला. अध्यक्षस्थान श्री.कृष्णदास पाटील यांनी भुषविले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन श्री.गिरीश बडगुजर यांनी केले तसेच प्रास्तविक सचिव श्री.ललितकुमार पाठक यांनी केले. आभार प्रदर्शन श्री.मराठे सर यांनी केले.

4) **स्वच्छता अभियान -**

संस्थेच्या कार्यालयांत संस्थेतील सर्व विकास सहयोगींनी स्वच्छता अभियानांत सक्रिय सहभाग नोंदविला. कार्यालयातील साफ सफाई करुन विकास सहयोगींनी या संदर्भात जन जागृती करण्यासाठी प्रयत्न केलेत.संस्थेतील KVK युनिट प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या शनिवारी व इतर सर्व युनिट प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या गुरुवारी कार्यलयात स्वच्छता अभियान राबवितात.

5) **युवा चेतना जागरण प्रशिक्षण वर्ग-**

संस्थेने युवा चेतना जागरण कार्यक्रमांत भाग घेतलेल्या तरुणांसाठी 2 दिवसांचा निवासी प्रशिक्षण वर्ग कृषि विज्ञान केंद्र, कोळदा येथे आयोजित केला.

या प्रशिक्षण वर्गात एकुण  गावांतील 66 तरुणांनी भाग घेतला. विविध प्रकल्पांची माहिती तसेच ग्रामविकासाची संकल्पना या प्रशिक्षण वर्गात मांडण्यात आली. तरुणांचे व गावांतील लोकांचे स्वास्थ्य चांगले राहावे यासाठी योगासन व प्राणायाम प्रशिक्षणार्थींना शिकविण्यांत आला. प्रशिक्षण वर्गासाठी योजक, जन शिक्षण संस्थान, कांतालक्ष्मी नेत्र रुग्णालय, योग विद्याधाम, कृषि विज्ञान केंद्र अशा विविध प्रकल्पांचे मार्गदर्शन व सहयोग झाला.

6) **मुंबई हल्ला स्मृति दिवस-**

26 नोव्हेंबर 2008 रोजी मुंबई वर झालेल्या अतिरेकी कारवाईस 6 वर्ष पुर्ण झाल्याचा निमित्ताने संस्थेने नंदुरबार शहरातील पोलिसांचा पोलीस मुख्यालयांत जावुन सत्कार केला. कार्यक्रमांस संस्थेचे अध्यक्ष श्री.कृष्णदास पाटील उपस्थित होते. पोलीसांच्या कार्यवाही मुळेच अनेक लोकांचे प्राण वाचविण्यांस मदत झाली असे मत संस्थेचे सचिव श्री.ललित पाठक यांनी मांडले. श्री.रंगनाथ नवले, श्री.संजय पाटील, श्री.केदारनाथ कवडीवाले, डॉ.नितीन पंचभाई व विकास सहयोगी उपस्थित होते.

7) **पत्रकार दिन-**

पत्रकार दिनानिमित्ताने संस्थेचे सचिव श्री.ललितकुमार पाठक यांनी नंदुरबार जिल्हयातील पत्रकारांना प्रोत्साहीत करुन त्यांचा गुलाब पुष्प देवुन सत्कार केला. पत्रकारांचे समाज परिवर्तानासाठी असलेले योगदान सचिवांनी सांगितले. अतिथी गृहात आयोजित या कार्यक्रमांस एकुण जवळपास 100 जणांनी सहभाग नोंदविला. कार्यक्रमास श्री.गिरीश बडगुजर, श्री.दिलीप जोशी, श्री.गोपाळकृष्ण पंचभाई, श्री. शरद जोशी उपस्थित होते.

8) **रुग्णांची भेट-**

खांडबारा समुहातील करंजाळी, निंबोणी व श्रावणी येथील शेतकऱ्यांची कांतालक्ष्मी शहा नंदुरबार येथे नेत्र तपासणी करुन त्यांच्यावर मोतीबिंदु शस्त्रक्रियाही करण्यात आली. त्या प्रसंगी त्यांची भेट घेऊन त्यांना बिस्कीटांचे वाटप करण्यात आले. त्यांच्ये व डॉक्टरांचे अभिवादन करण्यात आले. त्या वेळी संस्थेचे सचिव श्री. ललीतकुमार पाठक, जेष्ठ विश्वस्त श्री. रंगनाथ नवले व विकास सहयोगी उपस्थित होते.



## 2. आश्रमशाळा जळखे

आश्रमशाळेत या अहवाल वर्षात खालीलप्रमाणे कार्यक्रम राबविले गेले.

1) **गुरुपौर्णिमा व गणित शिक्षकांचा गुणगौरव सोहळा-**

व्यासपौर्णिमेनिमित्त विद्यार्थ्यांनी शिक्षकांवर फुले उधळून शिक्षकांचा गौरव केला. कै. वसंतराव चंद्रात्रे यांच्या स्मृतीदिनानिमित्त लोय आश्रमशाळा अंतर्गत असलेल्या दहा आश्रमशाळांतील गणित या विषयांत मार्च 2014 या वर्षात इ.10 वीत प्रथम आलेल्या विद्यार्थ्यांचा गुणगौरव करण्यात आला. तसेच त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांचा व मुख्याध्यापकांचा देखील गौरव करण्यात आला.

यासोबत डी.आर. विद्यालयातील उपक्रमशील गणित शिक्षक श्री. योगेश गवते यांना शाल, श्रीफळ व 500/- रोख सन्मानपत्र देवून कै.वसंतराव चंद्रात्रे पुरस्कार प्रदान करण्यात आला.

2) **लोकमान्य टिळक पुण्यतिथी-**

लो. टिळक यांच्या पुण्यतिथी निमित्ताने वकृत्वस्पर्धेचे तिन गटात आयोजन केले होते. लो. टिळकांच्या बालपणाचा शालेय व राजकिय आणि सामाजिक जीवनाचा परिचय करुन दिला. परिक्षक म्हणून जि. प. प्राथमिकशाळेचे मुख्याध्यापक श्री. एम. पी. शिंदे यांनी काम पाहिले.

3) **68 वा स्वातंत्र्यदिन-**

68 वा स्वातंत्र्यदिन रमेशजी भावसार यांच्या हस्ते संपन्न झाला. विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीते सादर केली.

4) **शिक्षक दिन -**

शिक्षक दिनानिमित्त विद्यार्थ्यांनी शिक्षकांच्या भुमिकेत काम करुन शाळेतील कामकाज समजुन घेतले व शिस्तीने वागून एक चांगला आदर्श सर्वांसमोर मांडला. दुपारच्या सत्रात भारताचे मा. पंतप्रधान श्री. नरेंद्रजी मोदी यांचे भाषण व विद्यार्थ्यांशी त्यांनी केलेला प्रश्नोत्तररुपी संवाद दुरदर्शनच्या माध्यमातून दाखविण्यात आला.

5) **दंत तपासणी शिबीर -**

नंदुरबार येथील लायनेस क्लबच्या डॉ. तेजल चौधरी यांच्या टिमने विद्यार्थ्यांची दंततपासणी केली. सोबतच विद्यार्थ्यांना दातांच्या आरोग्या विषयी मार्गदर्शन केले. योगशिक्षक श्री. चंदर मंगलाणी यांनी विद्यार्थ्यांना योगाचे महत्व सांगितले. विद्यार्थ्यांना टुथ पेस्ट व ब्रश वाटप करण्यात आले. संस्थेच्या संचालिका श्रीमती मिनल म्हसावदकर यांच्या पुढाकाराने हा कार्यक्रम यशस्वी झाला.

6) **म.गांधी जयंती व स्वच्छ भारत अभियान -**

म. गांधी जयंती निमित्त मुलांनी दोन गटात भारत स्वच्छ अभियानांतर्गत पहिल्या गटाने शालेय परिसरातील तसेच वर्गाची स्वच्छता केली दुसऱ्या गटाने गावातील मंदीरे, समाज ओटा, पाणवठयाच्या जागा यांची स्वच्छता केली. या कार्यक्रमाअगोदर विद्यार्थ्यांची हस्ताक्षर स्पर्धा घेण्यात आली.

7) **गणित यात्रेचे स्वागत -**

राष्ट्रीय विज्ञान परिषद व जिज्ञासा ट्रस्ट, ठाणे यांच्या संयुक्त विद्यमाने ठाणे ते नागपूर गणित यात्रा आयोजित केली होती. दि. 25 सप्टेंबर 2014 रोजी जळखे गावात दिंडी काढुन गणित यात्रेचे स्वागत करण्यात आले. या प्रसंगी गणित साहित्य प्रदर्शनी, व्याख्यान, गणित गप्पा असे विविध कार्यक्रम झाले. या प्रसंगी लिलावती गणित अभ्यास केंद्राचे उद्घाटन करण्यात आले.

8) **पाटीपुजन -**

दि. 03 ऑक्टोंबर 2014 ला विजयादशमीच्या निमित्ताने विद्येची देवता सरस्वती देवीचे पुजन करण्यात आले. विशेष म्हणजे या दिवशी प्रत्येक पाल्यास पुजेसाठी त्यांच्या आई-वडीलांकडून श्रफळ व अगरबत्ती आणुन दिली जाते. तसेच सर्व विद्यार्थ्यांनी पाटी व पुस्तकांचे हळदी-कुंकु वाहून पुजन केले.

9) **संविधान दिवस आणि 26/11 बद्दल कृतज्ञता -**

विद्यार्थ्यांना भारताचे संविधान वाचून दाखविण्यात आले व त्याचे महत्व विषद करण्यात आले. 26/11 च्या दहशदवादी हल्यात शहीद झालेल्या जवानांच्या स्मृतीस उजाळा देण्यासाठी काही विद्यार्थी व शिक्षक पोलिस मुख्यालयातील जावून



श्री. राजेंद्र रावसिंग, पो.नि., नंदुरबार यांचा आणि कर्मचाऱ्यांचा गुलाबपुष्प व कृतज्ञता पत्र देवून सन्मान केला. तसेच जळखे गावातील पोलिस सेवेत असलेल्या जवानांच्या आई-वडीलांचा सत्कार केला.

10) **म. फुले पुण्यतिथी -**

म. फुले पुण्यतिथी निमित्त वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आली विद्यार्थ्यांनी म.ज्योतिराव फुले यांच्या शिक्षण कार्यातील योगदानाबद्दल माहिती दिली.

11) **सावित्रीबाई फुले जयंती -**

भारतातील पहिल्या स्त्री शिक्षिका सावित्रीबाई फुले यांच्या प्रती आदर व्यक्त करण्याकरिता विद्यार्थ्यांनी त्यांचा जीवनकार्याचा परिचय सर्वांना करुन दिला.

12) **स्वामी विवेकानंद जयंती -**

12 जानेवारी 2015 रोजी स्वामी विवेकानंद जयंती साजरी करण्यात आली. प्रमुख वक्ते म्हणून डी. आर. विद्यालयाचे प्राध्यापक श्री. उमेश शिंदे यांनी विद्यार्थ्यांना विवेकानंदांच्या जीवन कार्याचा परिचय करुन दिला.

13) **प्रजासत्ताक दिन-**

भारताच्या 68 व्या प्रजासत्ताक दिना निमित्त मेडिकेअर हॉस्पिटलचे संस्थापक श्री. राजेश एच. वळवी यांच्या हस्ते ध्वजारोहणाचा कार्यक्रम संपन्न झाला. विद्यार्थ्यांनी बँडपथकाव्दारे संचलन करुन मानवंदना दिली. देशभक्तीपर गीते सादर केली. इ. 9 वी व 10 वी च्या विद्यार्थ्यांनी आकर्षक असे मनोऱ्यांचे प्रात्याक्षिक सादर केले.

14) **सहल -**

सहलीचे आयोजन संभाजीनगर (औरंगाबाद)- वेरुळ- खुलताबाद- शिर्डी या ठिकाणी करण्यात आले. त्यात 8 शिक्षक व 90 विद्यार्थी व विद्यार्थीनींनी सहभाग नोंदविला.

15) **मातृ-पितृ पुजन -**

14 फेब्रुवारी रोजी आश्रमशाळेत मातृ-पितृ पुजन दिवस दर वर्षी साजरा करण्यात येतो. या निमित्ताने सर्व विद्यार्थ्यांनी आप-आपल्या आई- वडीलांचे पुजन केले. अतिशय भावपुर्ण वातावरणात विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

# 3. जनजाती जीवन व शिक्षण संसोधन केंद्र

**1) आदिवासी गौरव दिवस-**

9 ऑगस्ट हा "विश्वआदिवासी गौरव दिवस" या निमित्ताने जळखे आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांनी आदिवासी बोलीभाषा मावची, भिलोरी, कोकणी, पावरा या प्रतिज्ञा म्हणुन दाखविली. आदिवासी पेहराव करुन आपले प्रतिनिधीत्व केले. झारखंड राज्यातील आदिवासी वीर क्रांतीकारक बिरसामुंडा यांचा जीवन परिचय आदिवासी बोलीभाषेत करुन दिला. गावातील भजनी मंडळाने आदिवासी बोलीभाषेत भजन म्हटले.

**2) स्वातंत्र्य दिन-**

स्वातंत्र्यदिना निमित्त जळखे आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांसाठी रांगोळीस्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते तसेच आदिवासी सजाजातील वीर क्रांतीकारक आणि समाजसेवक यांच्या चित्रप्रदर्शनीचे उद्घाटन करण्यात आले.

# 4.कृषि विज्ञान केंद्र

कृषि विज्ञान केंद्र, नंदुरबार द्वारा शेती विषयक नवनवीन संशोधनाचे प्रात्यक्षिक, प्रशिक्षण केले जाते.

जिल्हयातील शेतकऱ्यांना उपयुक्त असे कृषि तंत्रज्ञान, विविध पिकांचे वाण, बियाणे निमिर्ती, बचत गटांना करता येण्यासारखे कृषिउद्योग यांची प्रत्यक्ष पाहणी केंद्राच्या प्रक्षेत्रावर तसेच शेतकऱ्यांच्या शेतावर असते. कृषि विज्ञान केंद्रामध्ये माती परिक्षण, जैविक किड व रोग नियंत्रण पध्दती, प्रमुख अवजारे, जैविक खते यांच्या उत्पादनाच्या आणि प्रसाराच्या सुविधा उपलब्ध असतात तसेच मोबाईल वरुन कृषी विषयक एस.एम.एस. स्वयंचलित हवामान अंदाज देणारी यंत्रणा या सुविधा उपलब्ध असतात. दर दोन महिन्यांनी शेतकऱ्यांसाठी 'कृषक मंडळाचे' आयोजन केले जाते. त्यात शास्त्रज्ञ, प्रगतिशील शेतकरी यांचे चर्चासत्र घडवून आणले जाते.

दरवर्षी 'कृषि तंत्रज्ञान महोत्सवाचे' आयोजन केले जाते व त्यात बचत गटांच्या महिलांकरिता उद्योग परिषद, शेतकऱ्यांसाठी विविध विषयांवरील पिक परिसंवादाचे आयोजन करण्यात येते. विविध विषयातील शास्त्रज्ञ, स्वयंसेवी संस्थेचे कार्यकर्ते, कृषि अधिकारी, कृषि क्षेत्रातील विद्यार्थी, बचत गटातील महिला



व पुरुष तसेच शेतकरी केंद्रास महोत्सवादरम्यान मोठया प्रमाणावर भेट देतात. या वर्षीचा 9 वा कृषि तंत्रज्ञान महोत्सव 10-15 नोव्हेंबर 2014 दरम्यान मोठया उत्साहमध्ये साजरा झाला. त्यावेळी डॉ. हेडगेवार सेवा समिती संस्था पदाधिकारी, शास्त्रज्ञ, मोठ्या संख्येने शेतकरी, महिला कृषि विद्यालयातील विद्यार्थी, स्वयंसेवी संस्था आदींनी सहभाग नोंदविला. जिल्हयामध्ये कृषि विज्ञान केंद्राच्या माध्यमातून विविध प्रयोग सुरु आहेत.

आय.सी.ए.आर. भवन नवी दिल्ली येथे आयोजीत ट्रायबल सब प्लान (टी.एस.पी.) अंतर्गत जनजातीय संवाद कार्यशाळा चे आयोजन करण्यात आले होते. या राष्ट्रीय कार्यशाळेत कृषि विज्ञान केंद्र, नंदुरबारच्या यशस्वी प्रयोगांचे सादरीकरण करण्यात आले.

दरवर्षाप्रमाणे यावर्षीही आंतरराज्य शैक्षणीक सहल आत्मा डांग गुजरात येथील शेतकरी बांधवांनी कृषि विज्ञान केंद्राच्या प्रक्षेत्रास भेट दिली व प्रशिक्षणांतर्गत विविध विषयांची माहिती जाणुन घेतली.

यावर्षी दिनांक 2 ऑक्टोबर 2014 रोजी गांधी जयंती निमित्ताने कृषि विज्ञान केंद्र, कोळदा तसेच गाव कोळदा येथे भारत स्वच्छ अभियानांतर्गत गावकऱ्यांसोबत स्वच्छता अभियान राबविण्यात आले. यात कृषि विज्ञान केंद्राचे कर्मचारी व गावाकऱ्यांचा समावेश होता.

फळबाग व भाजीपाला, कुकुटपालन, शेती अवजारे, सुधारीत चूल, मधुमक्षीका पालन अशा विविध विषयाचे प्रशिक्षण आयोजीत करण्यात आले होते.

कृषि महाविद्यालय, शहादा येथील बी. एस्सी. कृषिचे विद्यार्थ्यांनी कार्यानुभव कार्यक्रमांतर्गत कृषि विज्ञान केंद्र, कोळदा येथे भेट दिली व विस्तार कार्य समजुन घेतले.

<u>अहवाल वर्षातील कार्यक्रम -</u>

जिल्हयामध्ये कृषि विज्ञान केंद्राच्या माध्यमातून विविध प्रयोग सुरु आहेत.

**i) जलवायु समुत्थानशील कृषिपर राष्ट्रीय पहल (NICRA) :**

यावर्षी 16 जुलै 2014 रोजी आय.सी.ए.आर. दिवस साजरा करण्यात आला. हवामान बदलांचा शेतीवर होणारा परिणाम अभ्यासण्यासाठी भारतीय कृषि अनुसंधान परिषदेने 'जलवायु समुत्थानशील कृषिपर राष्ट्रीय पहल (निक्रा)' हा महत्वाकांक्षी प्रकल्प सुरु केला आहे. हवामान बदलाच्या दृष्टीने भारतातील 100

जिल्ह्यांमध्ये हा प्रकल्प राबविला जात आहे. नंदुरबार जिल्ह्यात कृषि विज्ञान केंद्रातर्फे उमराणी ता. धडगाव येथे हा प्रकल्प सुरु आहे.

हवामान बदलामुळेशेतीवर होणारा परिणामांची तीव्रता कमी करुन शाश्वत उत्पादन मिळविण्यासाठी तंत्रज्ञानाची प्रात्यक्षिकेआयोजित केली जातात. या प्रात्यक्षिकांची चार घटकात विभागणी केलेली आहे. त्यात नैसर्गिक संसाधनांचे व्यवस्थापन, पीक उत्पादन, पशुसंवर्धन आणि संस्थात्मक उपाय समाविष्ट आहेत. या प्रत्येक घटकामध्ये विविध तंत्रज्ञानांची प्रात्यक्षिकेअसतात.

हवामान बदलाचा शेतीवर होणारा परिणाम याविषयी राष्ट्रीय स्तरावर जानेवारी 2013 मध्ये दिल्ली येथे निवडक 20 केव्हीके चे प्रयोग व त्याविषयी अनुभव मांडण्यात आले त्यात कृषि विज्ञान केंद्र, नंदुरबार द्वारा सादरीकरण करण्यात आले.

**ii) प्रमुख पिकांची उत्पादकता वाढ-पथदर्शी प्रकल्प (Lead Crop) :**

ग्रामीण विकास विषयक विविध प्रयोगांसाठी 'नाबार्ड' द्वारा प्रमुख पिकांची उत्पादकता वाढ-पथदर्शी प्रकल्प राबवण्यात येत आहे. नंदुरबार जिल्ह्यातील नवापूर तालूक्यात खांडबारा क्लस्टरमधील एकूण 14 गावे या कार्यक्रमाअंतर्गत निवडली आहे.

या गावात प्रमुख पिकेउदा. भात, सोयाबीन, तूर, रबी ज्वारी प्रयोग, या बाबत बिजोत्पादन, प्रात्यक्षिके, प्रशिक्षणे यांच्या माध्यमातून ग्रामस्तरावर पिकांची उत्पादकता वाढविणे अशी संकल्पना आहे. प्रमूख पिकांचे उत्पादक वाढ अंतर्गत यावर्षी मा. प्रकल्प संचालक आत्मा, नंदुरबार यांनी कार्यालयास भेट दिली.

**iii) मुक्त कृषि शिक्षण केंद्र (YCMOU):**

प्रशिक्षित मनुष्यबळ निर्मितीद्वारे शाश्वत ग्राम विकासाचा प्रयत्न डॉ.हेडगेवार सेवा समिती द्वारे नंदुरबार जिल्ह्यात सुरु आहे. त्याचाच एक भाग म्हणुन कृषि विज्ञान केंद्रात य.च.महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक संलग्नित मुक्त कृषि शिक्षण केंद्र चालविले जाते. कृषि क्षेत्रात पदविका व पदवी पर्यत शिक्षण या मुक्त कृषि शिक्षण केंद्रात घेता येते. या अंतर्गत वर्षभरात विद्यार्थ्यांसाठी प्रगतिशील शेतकरींचे तसेच करिअर गायडन्ससाठी मार्गदर्शन करण्यात येते. तसेच जिल्हाभरात दर वर्षी विद्यार्थ्यांसाठी शैक्षणीक सहलीचे आयोजन करण्यात येते. दिनांक 1 ऑगस्ट ते 20 जानेवारी पर्यत उद्घाटनासह समारोपीय कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. वर्ष 2014-15 अंतर्गत 3 पदविका व 2 पदवी शिक्षणक्रमाअंतर्गत एकुण 230 विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला आहे.



## 5. जनजाती विकास प्रकल्प (TDP)

**खांडबारा** समुहांतर्गत आठ गावांचा समावेश होतो यामध्ये बोरचक, करंजाळी, पालीपाडा, मोलीपाडा, निजामपुर, नगारे आणि निंबोणी या गावामध्ये जुलै 2007 पासुन राष्ट्रीय कृषि नवोन्मेषी प्रकल्प राबविण्यात आला. या प्रकल्पाची यशस्वीता पाहता वाडी प्रयोग इतर शेतकऱ्यांसाठी करावा उद्देशाने वाडी प्रकल्पाची संकल्पना पुढे आली.

यावर्षी उवरींत 200 वाडया उभारण्यात आल्या. तसेच त्यांना वाडी उभारण्यासाठी लागणारे इनपूट व तांत्रीक मार्गदर्शन देण्यात आले. सोबतच बांधावरती लावण्याकरीता रोप देण्यात आली.

या प्रयोगांतर्गत भुमिहीन कुटूंबाला त्यांच्या उपजिवीकेचे साधन म्हणुन गिरीराज जातीचे कोंबडीचे 20 पिल्ले व 1 महिन्याचे कोंबडीचे खाद्य देण्यात आले.

प्रयोगांतर्गत सामाजिक बांधीलकी वाढावी म्हणुन विविध प्रकारे उपक्रम राबविले जातात त्याचप्रमाणे कांतालक्ष्मी शहा दवाखाण्याचे डॉक्टरांनी नेत्र तपासणी शिबीरात करंजाळी निंबोणी व श्रावणी या गावातील लोकांची नेत्र तपासणी करण्यात आली. त्यात एकुण 500 लोकांची नेत्र तपासणी केली त्यात 77 लोकांना मोतीबिंदु होता त्यातील 36 लोकांची नंदुरबार येथे मोतीबिंदु शस्त्रक्रिया करण्यात आली.

हा प्रकल्प एकुण 7 वर्ष राबविला जाणार असुन या प्रकल्पाला 3 वर्ष पुर्ण होत आहेत.

### 6.शिक्षण संसाधन केंद्र (ERC)

डॉ. हेडगेवार सेवा समिती, नंदुरबार संचलित 'एज्युकेशन रिसोर्स सेंटर' हे शिक्षण क्षेत्रात 2008 सालापासुन कार्यरत आहे. शिक्षणात गुणवत्तेसाठी प्रयत्नशील आहे. विद्यार्थ्यांना शिक्षणात आवड निर्माण व्हावी, तसेच शिक्षणाबरोबरच विविध कलागुणांना वाव मिळावा. सेंटर म्हणजेच ERC विविध उपक्रम राबवित असते.

निबंधस्पर्धा, हस्ताक्षर स्पर्धा, विद्यार्थ्यांचा व शिक्षकांचा गुणगौरव, चित्रकला स्पर्धा, रंगभरण स्पर्धा, विविध 'दिन' साजरा करणे, गणित यात्रा, गणित आनंद यात्रा, अशा विविध उपक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थी व शिक्षकांपर्यत ERC पोहचवण्याचा प्रयत्न करीत असते. ERC तर्फे शैक्षणिक वर्ष 2014-15 मध्ये काही उपक्रम राबविले गेले त्यांची माहिती पुढीलप्रमाणे-

**1) गणित यात्रा-**

सप्टेंबर महिन्यात 25 तारखेला 'जिज्ञासा ट्रस्ट ठाणे', यांच्या तर्फे संपूर्ण महाराष्ट्रात गणित यात्रेचे आयोजन आले होते. या यात्रेचे नंदुरबार जिल्हयातील संयोजकत्व ERC ने घेतले होते. नंदुरबार शहर, तालुका व जिल्हयात ही यात्रा ERC च्या माध्यमातून यशस्वीपणे पार पाडली. या यात्रेत नंदुरबार, शहादा, नवापूर, धडगाव आणि अक्कलकुवा या तालुक्यांमधील काही निवडक शाळा, डाब, मोलगी या आश्रमशाळा खांडबारा, आष्टे, जळखे, चिंचपाडा येथील शाळांमध्ये ही यात्रा ERC ने पोहचवली. या यात्रेत एकुण 11 शाळा, 153 शिक्षक आणि 2395 विद्यार्थ्यांचा समावेश होता. गावातील प्रतिष्ठीत नागरिक तसेच 'नंदुरबार एकात्मिक प्रकल्प' कार्यालयाचे सहाय्यक प्रकल्प अधिकारी श्री. तांबोळी साहेब यांनी जळखे आश्रमशाळेत गणितयात्रेसाठी उपस्थिती नोंदवली.

**2) रंगभरण स्पर्धा-**

14 नोहेंबर, पं. जवाहरलाल नेहरु यांची जयंती 'बालदिवस' म्हणून साजरी केली. या निमित्ताने 'रंगभरण' स्पर्धेचे आयोजन ERC तर्फे केले गेले होते. नंदुरबार शहर व तालुक्यातील एकुण 14 खाजगी प्राथमिक शाळा आणि आश्रमशाळांनी या स्पर्धेत सहभाग नोंदविला. इ. 1ली ते इ.4 थी च्या एकुण 1120 विद्यार्थ्यांनी या स्पर्धेचा आनंद घेतला. विजयी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र, मानचिन्ह आणि रंगाचा बॉक्स बक्षिस म्हणून श्री. संदीपजी श्रॉफ, श्रीरंगरेखा प्रिंटर्स व श्री मनोज शाह यांच्या कडून देण्यात आले. या प्रसंगी विद्यार्थ्यांचे पालकही उपस्थित होते.

**3) गणित आनंद यात्रा-**

डिसेंबर महिन्यात 22 डिसेंबर ते 27 डिसेंबर 2014 या दरम्यान 'गणित आनंद यात्रा' ERC तर्फे सलग 5 दिवस घेण्यात आली. विद्यार्थ्यांच्या मनातील गणित विषयाबद्दलची भिती दुर व्हावी व त्यांना गणित विषयाची गोडी लागावी यासाठी या यात्रेचे आयोजन करण्यात आले होते. गणितगाणे, गणितगोष्टी, गणितीय कोडी, गणित साहीत्याचे प्रदर्शन, गणित तज्ञांचे व्याख्यान असे विविध कार्यक्रम गणित आनंद यात्रेत राबविले गेले. या कार्यक्रमासाठी खास अमरावतीहून गणितज्ञ श्री. एम. एल. नानकर आणि नाशिकहून श्री. दिलीपजी गोटखिंडीकर यांना आमंत्रित करण्यात आले होते.

**4) हस्ताक्षर स्पर्धा-**

अक्षरयोगी नाना लाभे यांच्या स्मृतीप्रित्यर्थ विद्यार्थ्यांच्या अक्षराला वळण लागावे म्हणून जानेवारी महिन्यात 'हस्ताक्षर' स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.



या स्पर्धेत शासकीय तसेच अनुदानित आश्रमशाळा, जि. प. शाळा. न. पा. च्या शाळा, खाजगी प्राथमिक शाळा अशा सर्व शाळांचा सहभाग होता. एकुण 15 शाळांनी स्पर्धेत सहभाग नोंदवला. 750 विद्यार्थ्यांनी हस्ताक्षर सुधार कार्यक्रमात भाग घेतला. एकुण 5 विद्यार्थ्यांना रोख रकमेचे बक्षिसं श्री. नरेश शहा यांच्या कडुन देण्यात आले. या स्पर्धेचे वैशिष्टय असे होते की, विद्यार्थ्यांनी त्यांच्या हस्ताक्षरात लिहीलेल्या गोष्टींचे प्रत्येक शाळेचे स्वतंत्र हस्तलिखीत तयार करुन त्या-त्या शाळेला भेट म्हणून दिले गेले.

अशाप्रकारे विविध कार्यक्रमांच्या माध्यमातून ERC शाळांपर्यंत, विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न करत असते आणि शिक्षणातील गुणवत्तेसाठी नेहमीच प्रयत्नशील असते व राहील.

**6) लिलावती गणित अभ्यास केंद्र -**

दि. 25 सप्टेंबर 2014 रोजी, गणित यात्रेच्या निमित्ताने गणितप्रेमींसाठी एज्युकेशन रिसोर्स सेंटर अंतर्गत लिलावती गणित अभ्यास केंद्राचे उद्घाटन मा. प्रकल्प सहाय्यक श्री. तांबोळी साहेब यांच्या हस्ते करण्यात आले. गणित विषयावरील विविध साहित्य आणि गणित पुस्तकांचा यात समावेश आहे.

## प्रेरणा

खंबीरपणे उभे राहा. धैर्यवान व्हा. सर्व दायित्व स्वत:च्या खांद्यावर घ्या आणि जाणून असा की, तुम्हीच तुमच्या भाग्याचे निर्माते आहात. तुम्हाला आवश्यक असलेले सर्व सामर्थ्य आणि साहाय्य तुमच्या ठायीच विद्यमान आहे. लक्षात ठेवा, तुम्ही उच्चारलेला प्रत्येक शब्द, केलेला प्रत्येक विचार आणि प्रत्येक कृत्य हे तुमचे कर्मसंचित घडवीत असतो. दुष्ट विचार आणि दुष्ट कृती हया जशा तुमच्यावर वाघासारख्या झडप घालायला टपलेल्या असतात तसेच तुमचे शुभ विचार आणि तुमची शुभ कृत्ये हजारो लाखो देवदुतांची शक्ती धारण करुन तुम्हाला सामर्थ्य देण्यासाठी, तुमचे रक्षण करण्यासाठी सदैव सिध्द असतात.

- स्वामी विवेकानंद